**ठळक बातम्या**

- जागतिक समस्यांवर स्थानिक उपाय शोधण्याची गरज असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
- मुंबईत आयोजित भारत-संयुक्त अरब अमिराती बिझनेस फोरममधे ऊभय देशांदरम्यान दहा करार
- भारतीय सायबर गुन्हे प्रतिबंधक समन्वय केंद्राच्या चार नवीन यंत्रणांचं केंद्रीय गृहमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन
- महाराष्ट्रात आगामी विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाची व्यवस्थापन समिती स्थापन

**आणि**

- पॅरीस पॅरालिम्पिकमधल्या भारतीय खेळाडूंचा केंद्रीय क्रीडामंत्र्यांच्या हस्ते सत्कार

**<><><><><>**

जागतिक समस्यांवर स्थानिक उपाय शोधण्याची गरज असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. त्यांनी आज, नवी दिल्ली इथं स्थापन केलेल्या अनुसंधान नॅशनल रिसर्च फाउंडेशनच्या, पहिल्या व्यवस्थापकीय बैठकीचं अध्यक्षपद भूषवलं, त्यावेळी ते बोलत होते. संशोधन परिसंस्थेच्या मार्गातले अडथळे ओळखून ते दूर करण्यासाठी योग्य पावलं

उचलायला हवीत, असं आवाहन त्यांनी यावेळी केलं. संशोधनामध्ये सध्याच्या आव्हानांवर नवीन उपाय शोधण्यावर भर द्यायला हवा असं ते म्हणाले.

संस्थांचं श्रेणीकरण आणि मानकीकरणावर भर देत, विकासाच्या प्रगतीचा मागोवा घेण्यासाठी विविध क्षेत्रातल्या तज्ञांची यादी आणि डॅशबोर्ड विकसित करायला हवा असं प्रधानमंत्री म्हणाले. संशोधन कार्यात साधन संपत्तीची कमतरता भासणार नाही, यावर वैज्ञानिक समुदायानं विश्वास ठेवायला हवा असं आवाहन त्यांनी केलं. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या शिफारसीनुसार अनुसंधान नॅशनल रिसर्च फाउंडेशनची स्थापना करण्यात आली आहे. देशातली विद्यापीठं, महाविद्यालयं, संशोधन संस्था आणि संशोधन आणि विकास प्रयोगशाळांमध्ये संशोधन आणि नवोन्मेष संस्कृतीला चालना देणं, हे याचं उद्दिष्ट आहे. देशातल्या वैज्ञानिक संशोधनाला उच्च स्तरीय धोरणात्मक दिशा देणारी सर्वोच्च संस्था म्हणून ती काम करेल.

<><><><><>

मुंबईत आज भारत-संयुक्त अरब अमिराती यांच्यात आयोजित बिझनेस फोरममधे दोन्ही देशांदरम्यान दहा करार करण्यात आले. यात जैविक शेती, प्रक्रिया केलेल्या अन्नाची आयात, लघु आणि सूक्ष्म उद्योगांना चालना आदी करारांचा समावेश आहे.

अबुधाबीचे युवराज शेख खालेद बिन मोहम्मद बिन झायेद अल नाहयान आणि आणि केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियूष गोयल यांनी संयुक्तपणे या मंचाचं अध्यक्षपद भूषवलं. भारत आणि संयुक्त अरब अमिराती यांच्यातले संबंध हेवा वाटावे असे आहेत, असं प्रतिपादन केंद्रीय मंत्री पियूष गोयल यांनी यावेळी केलं. संयुक्त अरब अमिराती हा भारताच्या प्रगतीतला महत्वाचा भागीदार आहे, दोन्ही देशांमधल्या देवाणघेवाणीत विकसित भारताचं उद्दिष्ट सामावलेलं आहे, असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

सायबर सुरक्षा हा विषय केवळ डिजिटल व्यवहारांपुरता सीमित राहिला नसून देशाच्या संरक्षण यंत्रणेचा अविभाज्य घटक बनल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत आय फोर सी म्हणजेच भारतीय सायबर गुन्हे प्रतिबंधक समन्वय केंद्राच्या पहिल्या वर्धापन दिन सोहळ्यात बोलत होते. जगातल्या एकूण डिजिटल व्यवहारांपैकी जवळजवळ निम्मे व्यवहार भारतात होतात, त्यामुळे भारतात सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी अधिकाधिक आधुनिक तंत्रज्ञान आवश्यक असल्याचं ते म्हणाले.

सायबर गुन्ह्यांविषयीच्या माहितीचं सर्वसमावेशक संकलन करण्यासाठी समन्वय या मंचाचं तसंच संशयित बाबींची नोंद करणाऱ्या सस्पेक्ट रजिस्ट्रीचं उद्घाटन त्यांनी केलं. या मंचावरची माहिती सर्व चौकशी यंत्रणांना उपलब्ध असेल. सायबर फ्रॉड मिटिगेशन सेंटरचं लोकार्पणही शहा यांनी या कार्यक्रमात केलं. पोलिसांना सायबर गुन्हेगारीविषयी माहिती आणि उपाययोजनांचं प्रशिक्षण देणाऱ्या सायबर कमांडो कार्यक्रमाचा प्रारंभ त्यांनी केला. सायबर गुन्हेगारी आणि त्यापासून

बचावाचे उपाय याविषयी जनजागृती करण्यासाठी आय फोर सी मार्फत विशेष कार्यक्रम राबवला जाणार आहे. देशभरातल्या ७२ दूरचित्रवाहिन्या, चित्रपटगृहं आणि इतर माध्यमातून जनतेपर्यंत ही माहिती पोहचवली जाणार आहे. सायबर सुरक्षेसाठी १९३० हा दूरध्वनी मदत क्रमांक आय फोरसीनं उपलब्ध करुन दिला आहे. या जनजागृती मोहिमेत सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांनी सहभाग घ्यावा, असं आवाहन शहा यांनी केलं.

**<><><><><>**

आगामी हरियाणा विधानसभा निवडणुकीसाठी भाजपनं आज २१ उमेदवारांची आणखी एक यादी जाहीर केली आहे. त्यात जुलाना विधानसभा मतदारसंघातून कॅप्टन योगेश बैरागी यांना ऑलिंपिक खेळाडू विनेश फोगट यांच्या विरुद्ध उमेदवारी दिली आहे. यापूर्वी भाजपनं एकूण ६७ उमेदवारांची यादी जाहीर केली होती.

**<><><><><>**

श्रोते हो, विविध देशांमधल्या गणेशोत्सवाची माहिती आपण जाणून घेत आहोत. या मालिकेत आजच्या भागात अमेरिकेतल्या मिनियापोलिस इथल्या गणेशोत्सवाची माहिती देताना श्रद्धा बरीदे यांनी आकाशवाणीला सांगितलं,

**होल्ड - श्रद्धा बरीदे**

**<><><><><>**

महाराष्ट्रात, आगामी विधानसभा निवडणुकीसाठी भाजपानं व्यवस्थापन समिती स्थापन केली आहे. तीन सहसंयोजक, विविध स्तरांवरच्या समित्यांचे प्रमुख, विशेष आमंत्रित आणि पदसिद्ध सदस्यांचा यात समावेश असल्याची

माहिती माजी केंद्रीय राज्यमंत्री आणि या समितीचे अध्यक्ष रावसाहेब दानवे यांनी दिली. बूथ पर्यंतची यंत्रणा सक्षम करण्यासाठी पक्षातर्फे ही व्यवस्थापन समिती तयार केल्याचं ते म्हणाले. जाहीरनामा समितीचं प्रमुखपद सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे देण्यात आलं असून प्रचार यंत्रणा रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्त्वाखाली असेल. महायुती निवडणूक अभियान समन्वयक म्हणून गिरीश महाजन काम पाहणार आहेत. विशेष आमंत्रित म्हणून नितीन गडकरी, चंद्रशेखर बावनकुळे, देवेंद्र फडनवीस, पीयूष गोयल, विनोद तावडे, आशिष शेलार, नारायण राणे यांच्यासह पक्षाचे अन्य नेते या समितीमध्ये असतील.

**<><><><><>**

आगामी विधानसभा निवडणुकीत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाला योग्य ते प्रतिनिधित्व मिळेल, अशी अपेक्षा पक्षाचे अध्यक्ष, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी व्यक्त केली आहे. ते आज पुण्यात वार्ताहर परिषदेत बोलत होते. विधानसभा निवडणुकीसाठी रिपाइनं १२ जागांची मागणी केली आहे. रिपाइंमुळे महायुतीतल्या तीनही प्रमुख पक्षांना चांगला फायदा होणार असल्यानं त्यांनी ही मागणी पूर्ण करावी, असं आठवले म्हणाले.

**<><><><><>**

पॅरीस पॅरालिम्पिकमधल्या भारतीय खेळाडूंचा आज नवी दिल्लीत जवाहरलाल नेहरू स्टेडियम इथं आयोजित समारंभात केंद्रीय क्रीडा आणि युवा कल्याण मंत्री मनसुख मांडवीय यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी विजेत्या खेळाडूंना बक्षीसाचे धनादेश सुपूर्द करण्यात आले. सुवर्ण पदक विजेत्यांना ७५ लाख रुपये, रौप्य पदक विजेत्यांना ५० लाख आणि कांस्य पदक विजेत्या खेळाडूंना ३० लाख रुपये बक्षीस देण्यात आलं.

**<><><><><>**

कर्नाटकात मैसुरु इथलं आकाशवाणी केंद्र  आज ९० वा वर्धापन दिन साजरा करत आहे. ऐकूया या केंद्राविषयी अधिक माहिती…

**होल्ड व्हाईस कास्ट**

*(१९३५ मधे तत्कालीन मैसुरु राज्यातल्या महाराजा महाविद्यालयातले मानसशास्त्राचे प्राध्यापक डॉ. एम व्ही गोपालस्वामी यांनी ३० वॅट्सचा प्रक्षेपक घरच्या घरी बसवून आकाशवाणी नावाचं हे नभोवाणी केंद्र सुरु केलं. वैयक्तिक पातळीवर सुरु झालेलं हे देशातलं पहिलं नभोवाणी केंद्र ठरलं. कर्नाटक संगीतातले दिग्गज वासुदेवाचार्य यांच्या कार्यक्रमाने प्रसारणाचा प्रारंभ झाला. १९४२ मधे मैसुरुच्या महाराजांनी हा प्रक्षेपक ताब्यात घेतला. आणि १९४४ मधे नवीन इमारतीत सरकारी मालकीच्या या नभोवाणी केंद्राचा कारभार सुरु झाला.  त्यानंतर कर्नाटकातले प्रसिद्ध लेखक आणि पत्रकार नारायण कस्तुरी यांनी केंद्राचं कामकाज सांभाळलं. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९५० मधे केंद्रसरकारच्या ऑल इंडिया रेडियो मधे हे केंद्र विलीन झालं. गंमत म्हणजे या केंद्राचं आकाशवाणी हे नाव देशव्यापी नभेवाणी सेवेचं भारतीय नाव बनलं. पहाटे ५ वाजून ५५ मिनिटांपासून  ते रात्री ११ वाजून ५ मिनिटांपर्यंत प्रसारण सुरु करण्याचं, शैक्षणिक कार्यक्रम तसंच दक्षिणेतल्या राज्यांमधे हिंदीचे पाठ प्रसारित करण्याचं श्रेय या केंद्राला जातं.)*

**<><><><><>**

शिवसेनेचे ज्येष्ठ नेते आणि माजी आमदार विजय अर्थात अप्पा साळवी यांच्या पार्थिवावर आज संध्याकाळी रत्नागिरीतल्या मिरकरवाडा अमरधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार झाले. काल रात्री त्यांचं वार्धक्यानं निधन झालं. ते ९५ वर्षांचे होते. रत्नागिरी जिल्ह्यात शिवसेना रुजवण्यात आणि वाढवण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. १९९५ ते १९९९ या काळात त्यांनी आमदार म्हणून, राजापूर विधानसभा मतदारसंघाचं प्रतिनिधित्व केलं होत.

//<><><><><>//